पुणे शहर पोलीस

# दर्पण

नोव्हेंबर २०१९

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.,
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- डी. एम. [illegible] शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर
[illegible]

विषय :- दर्पण पुस्तिकाबाबत अभिप्रायबाबत.

महोदय,

[illegible]

[illegible]

पो. हवालदार [illegible]
दि. [illegible]

(डी.एम. [illegible])
पोलीस हवालदार [illegible]
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

प्रति,

मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक साो,
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.
यांना सविनय सादर.....

प्रतिवेदक :- संगमा एस.केंद्रे पो.शि.८७७४,
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.

विषय :- दर्पण या मासिकाबाबत अभिप्राय सादर केलेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास सविनय सादर की, आम्हास दर्पण या मासिकाबाबत अभिप्राय मागवला असता त्याबाबत आमचा अभिप्राय असा की, सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदाप्रमाणे पोलीसांच्या कार्याचे प्रतिबिंब हे दर्पणमधून दिसत असल्याने पोलीस विषयी कार्याचा गौरव समाजात होत असल्याने पोलीसांविषयी समाजात चांगली स्वच्छ प्रतिमा तयार होणेसाठी दर्पणच्या माध्यमातून पोलीसांच्या कार्याचा गौरव समाजापर्यंत पोहचण्याचे एक चांगले माध्यम आहे. पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी हे आपले कार्याचे प्रतिबिंब समाजात दिसावे म्हणून पोलीस चांगल्याचे अधिक काम करण्याची धडपड चालू आहे.

दर्पण या मासिकामुळे पुणे शहर पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामगिरीची प्रसिध्दी या माध्यमातून स्थानिक नागरीकांपर्यंत पोहचू लागली. त्यामुळे पोलीसांची केलेल्या उत्तम कामगीरी लोकांच्या माध्यमातून स्वागत करु लागले. पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन कडील उत्तम कामगीरीबाबत ज्या पोलीस स्टेशनची प्रसिध्दी झाली त्यावेळी इतर पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी यांची भावना आपले पण पोलीस स्टेशनचे नाव या कामगीरीबाबत यायला पाहिजे पोलीस स्टेशनचे नाव लौकीक व्हावे म्हणून पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये उत्तम कामगीर करण्याची स्पर्धा होवु लागली. त्यामुळे हद्दीमध्ये पेट्रोलींग,गोपीनिय माहिती ,हद्दीपार आरोपी व इतरी स्वरुपाची गोपीनिय माहिती काढून त्यामध्ये आरोपी यांचेवर कडक कारवाई होवु लागल्याने आरोपी यांचेवर वचक बसल्याने गुन्ह्याचे प्रमाण कमी होवु लागले.

दर्पणामध्ये आमचे कार्याचे प्रतिबिंब उमट असल्याने आमचा दर्पणाचा सार्थ अभिमान आहे.पोलीस प्रशासनाचे स्वच्छ व समाजाभिमुख कार्य या दर्पणामधून समाजासमोर येत असल्याने समाजात पोलीस प्रशासनाच्या कार्याचा व विश्वासीयतेचा आलेख वाढत आहे. त्याबरोबरच समाजातील समाजविघातक व्यक्तीवर वचक बसत आहे. तसेच दर्पणामुळे पोलीसांविषयी समाजात स्वच्छ व चांगली प्रतिमा होणेसाठी मदत होत आहे.

(संगमा एस.केंद्रे)
पोलीस कॉन्स्टेबल
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.

# कारवाई

कारवाई

# हातचलाखीने पैसे लांबविणाऱ्या इराणी नागरिकास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : तुर्किस्तानचे नागरिक असल्याचे सांगून भारतीय चलनी नोटा कशा प्रकारच्या असतात हे पाहायचे असल्याचे सांगून ५० हजारांच्या बंडलमधील हातचलाखी करून २४ हजार ५०० रुपये काढून घेणाऱ्या इराणी नागरिकास गुन्हे शाखेच्या युनिट ४च्या पथकाने अटक केली.

महंमद शमसाबाद अबोलफझल (वय २८, रा. तेहरान फार्दीस, इराण) असे त्याचे नाव आहे. तो व त्याची पत्नी रेशमा अहमदी फिरोजाबाद ही जून २०१९ पासून टुरिस्ट व्हिसावर भारतामध्ये आलेला आहे. इतके दिवस तो दिल्लीत राहत होता. १७ नोव्हेंबर पासून तो पत्नी व मुलासह पुण्यात आला असून ढोले पाटील रोडवरील एका नामांकित हॉटेलमध्ये राहत होता.

याबाबतची माहिती अशी, येरवडा येथील सनसिटी चौकातील मेडिकल दुकानात १८ नोव्हेंबरला रात्री ९ वाजण्याच्या सुमारास हे दोघे पतीपत्नी आले. त्यांनी आपण तुर्किस्तानचे नागरिक असल्याचे सांगून भारतीय चलनी नोटा कशा प्रकारच्या असतात, हे पाहायचे आहे, असे सांगितले. दुकानदाराने त्यांना गल्ल्यातील ५०० व २ हजार रुपयांच्या चलनी नोटा असलेल्या ५० हजार रुपयांचे बंडल दाखविले. त्याने बंडल हातात घेऊन ते हाताळण्याच्या बहाण्याने करून त्यातील २४ हजार ५०० रुपये काढून घेतले. या गुन्ह्याचा समांतर तपास करण्यास अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे व उपायुक्त बच्चन सिंह यांनी गुन्हे शाखेच्या युनिट ४ला सांगितले. पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड, पोलीस हवालदार जितेंद्र तुपे, हनुमंत बोराटे यांनी मेडिकल शॉपमधील सीसीटीव्ही फुटेज पाहून त्याच्या अभ्यास करून अशा प्रकारचे गुन्हे हे इराणी नागरिक करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी इराणी नागरिक पुणे स्टेशन व कोरेगाव पार्कातील हॉटेल्समध्ये सीसीटीव्हीच्या आधारे तपासणी सुरू केली.

## अंगझडतीत २४ हजार ५०० रुपये केले हस्तगत

- २० नोव्हेंबरला रात्री ९ वाजण्याच्या सुमारास हे जोडपे हॉटेलमध्ये जेवणाकरिता दाखल झाले. दुकानातील फुटेजप्रमाणे ते असल्याची खात्री पटल्यावर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यांच्या अंगझडतीत चोरीला गेलेली २४ हजार ५०० रुपये हस्तगत केले आहे. महम्मद अबोलफझल याने यापूर्वी या प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याची अधिक चौकशी करण्यात येत आहे.

Sakal Times - 6 November, 2019

# One held for cyberstalking college student

ST CORRESPONDENT
reporters@sakaltimes.com

**PUNE:** Officials of the Cyber Crime Cell has arrested a youth for creating fake social media profile and sending abusive messages to a female college student.

The arrested accused was identified as Sandip Jadhav (28) from Satara.

According to Police Inspector Jayram Paigude, the victim, a resident of Pashan, accepted a friend request on a social media site from a girl.

After accepting the friend request on the social media site, the victim started getting abusive messages, pornographic videos and messages from the profile.

The victim then approached the police and lodged a case.

Based on technical details, police officials arrested Jadhav from Satara and a case against him was lodged at Chaturshrungi police station.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ०२ नोव्हेंबर, २०१९

# पिस्तूल बाळगणारा सराईत अटकेत

पुणे : पिस्तूल बाळगणाऱ्या सराईताला गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने अटक केली. अजय लक्ष्मण इजगज (वय २६, रा. डी. पी. रोड, औंध) असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल, एक जिवंत काडतूस, असा ४० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. त्याचा अन्य एक साथीदार फरारी झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजय याच्याविरोधात चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फौजदार लहू सातपुते, कर्मचारी तुषार खडके, रिझवान जिनेडी पथकासह परिसरात रात्र गस्तीवर होते. त्या वेळी एक व्यक्ती मॅंडलवुड सोसायटीच्या समोरील फुटपाथवर थांबला असून, तो पिस्तूल विकण्यासाठी आल्याची माहिती खडके यांना मिळाली. त्याचा मित्र चंद्रकांत आव्हाड त्याला गावठी पिस्तूल आणून देणार असल्याचे पोलिसांना समजले. त्यानुसार छापा टाकून अजयला ताब्यात घेण्यात आले. तर पोलिस आल्याची चाहूल लागताच आव्हाड पसार झाला.

लोकमत – दि. ३ नोव्हेंबर, २०१९

# दीडकोटीची फसवणूक; आणखी एकास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : घेतलेल्या मालाचे पैसे परत न करता व्यापाऱ्याची १ कोटी ५९ लाख ३६ हजार ३५६ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी स्वारगेट पोलिसांनी आणखी एकाला अटक केली. न्यायालयाने त्याला ४ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश दिला. गौरव दिनेश सोनी (वय २८) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी यापूर्वी दोघांना अटक करण्यात आली होती.

याबाबत ४८ वर्षीय व्यापाऱ्याने फिर्याद दिली आहे. १८ एप्रिल २०१९ ते २८ जुलै २०१९ या कालावधीत मार्केट यार्ड परिसरात ही घटना घडली. स्टील पुरविण्याचा व्यवसाय करण्याच्या उद्देशाने आरोपींनी फिर्यादीकडून ३ कोटी ७० लाख ५९ हजार ५३० रुपयांचे स्टील विकत घेतले. त्यातील २ कोटी २६ लाख १९ हजार १७४ रुपये आरोपींनी फिर्यादीला परत केले. मात्र, उर्वरित १ कोटी ५९ लाख ३६ हजार ३५६ रुपये परत केले नाही. वेळोवेळी पाठपुरावा करून देखील आरोपींनी उर्वरित रक्कम दिली नाही. त्यानंतर फिर्यादीला एका बँकेचा धनादेश देण्यात आला. मात्र, तो वटला नाही, असे फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी सोनी याला न्यायालयात हजर केले असता गुन्ह्याच्या तपासासाठी त्याला पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकिलांनी केली.

# मुलीचे अपहरण करणाऱ्या महिलांना अटक

## सोलापूरमधून घेतले मुलीला ताब्यात

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

घराबाहेर खेळणाऱ्या पाच वर्षांच्या मुलीचे अपहरण करून फरारी झालेल्या दोन महिलांना विमानतळ पोलिसांनी 'सीसीटीव्ही'च्या मदतीने तपास करून अटक केली. आजारामुळे पोटच्या मुलीचा मृत्यू झाल्याने आरोपी महिलेने मैत्रिणीच्या मदतीने लोहगाव येथून पाच वर्षांच्या मुलीचे अपहरण केल्याचे तपासात समोर आले आहे.

हिराबाई भानुदास खंडागळे (वय ५५) आणि जयश्री शिवाजी कोळी (वय २६, सध्या रा. माईचा वाडा, काजग, मूळ रा. - सोलापूर) अशी अटक केलेल्या आरोपी महिलांची नावे आहेत. या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी फिर्याद दिली आहे. ते हाउस कीपिंगचे काम करतात, तर त्यांची पत्नी घरकाम करते. फिर्यादी दाम्पत्याला दोन मुली आणि एक मुलगा आहे. शनिवारी (१६ ऑक्टोबर) घराबाहेर त्यांच्या दोन्ही मुली खेळत होत्या. या वेळी लहान मुलगी (वय ५) अचानक गायब झाली. बराच वेळ शोधूनही ती सापडत नसल्याने तिच्या वडिलांनी पोलिसांना माहिती दिली. विमानतळ पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी येरवडा रस्त्यावरील सोसायटी आणि परिसरातील 'सीसीटीव्ही' तपासण्याचे काम सुरू केले. त्या वेळी दोन महिला मुलीला घेऊन जात असल्याचे दिसून आले. 'सीसीटीव्ही'च्या मदतीने दोन्ही महिलांचे फोटो काढले. या आधारे तपास करीत असताना हिराबाई खंडागळे ही पूर्वी लोहगावमधील कलवडवस्तीत राहण्यास असल्याचे समोर आले. पोलिसांनी अधिक माहिती घेतली असता ती सध्या काजगमधील माईचा वाडा भागात राहत असल्याचे समजले.

पोलिसांनी तेथे जाऊन खंडागळेला ताब्यात घेतले. तिच्याकडे चौकशी केली असता जयश्री कोळीने अपहरण केलेल्या मुलीला सोलापूरला नेल्याचे समजले. पोलिसांनी तत्काळ सोलापूरला महिलेच्या घरी जाऊन पाच वर्षांच्या मुलीला ताब्यात घेऊन कोळीला अटक केली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक आनंद पिंगळे, कर्मचारी प्रशांत कापुरे, गाडे, विनोद महाजन, अविनाश शेवाळे आणि विष्णू धोंगे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

### 'पोटच्या मुलीचा मृत्यू झाल्याने अपहरण'



'मूळची सोलापूरची असणाऱ्या जयश्री कोळीचे लग्न झाले आहे. सहा महिन्यांपूर्वी ती तिच्या पाच वर्षांच्या मुलीला घेऊन प्रियकरासोबत पुण्याला पळून आली होती. काजगमध्ये राहण्यास आल्यावर शेजारी राहणाऱ्या हिराबाई खंडागळेसोबत तिची ओळख झाली होती. तीन महिन्यांपूर्वी कोळीच्या पाच वर्षांच्या मुलीचा ससून रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. गावाकडे गेल्यास मुलीविषयी पतीला काय सांगणार, असा प्रश्न तिला भेडसावत होता. त्यामुळे कोळीने खंडागळे हिच्यासोबत चर्चा करून गावाला जाण्यापूर्वी दुसऱ्या पाच वर्षांच्या मुलीचे अपहरण करण्याचा प्लॅन केला. खंडागळे आधी कलवडमध्ये राहण्यास असल्याने दोघींनी लोहगावमधून मुलीचे अपहरण करण्याचे ठरविले. त्यांनी शनिवारी दुपारी मुलीचे अपहरण करून तिला सोलापूरला नेले होते.' अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन पवार यांनी दिली.

क्राइम डायरी

**लोकमत** – दि. ७ नोव्हेंबर, २०१९

# धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी करणाऱ्या दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून धारदार शस्त्राने वार करून एकाला गंभीर जखमी करणाऱ्या दोघांना बिबवेवाडी पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने त्यांना ११ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. याप्रकरणी आकाश संतोष चव्हाण (वय २०, रा. राजगड चाळ, इंदिरानगर) याने फिर्याद दिली आहे.

दर्शन ऊर्फ डी. युवराज हळंदे (वय १९, रा. राजीव गांधी नगर, बिबवेवाडी), खुशाल ऊर्फ दाया संतोष शिंदे (वय २०, रा. बिलाल मशीदशेजारी, बिबवेवाडी) अशी कोठडी सुनावण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. ही घटना ५ नोव्हेंबर रोजी पहाटे साडेचार ते पाच वाजण्याच्या दरम्यान बिबवेवाडी येथील बर्थ डे हाऊस दुकानासमोर घडली. फिर्यादी व त्यांचा जखमी मित्र प्रथमेश चव्हाण हे मार्केटयार्ड येथे कामावर जाताना आरोपी पारेकर व हळंदे यांनी त्यांना अडवून पारेकर याने चव्हाण यास 'काय रे तुला मस्ती आली का? सुनीलची कम्प्लेंट करतो काय? आज तुला संपवतो. आज तुझा आम्ही गेम वाजवतो.' असे बोलून चव्हाण याच्यावर धारदार हत्याराने वार करण्यास सुरुवात केली. प्रथमेश याने पळ काढताच त्याचा पाठलाग करून 'आज तुला खल्लास करणार' अशी धमकी देऊन त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने गंभीर जखमी केले.

अटक आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली हत्यारे जप्त करणे, आरोपींकडे सखोल चौकशी करून त्यांचे अन्य कुणी साथीदार आहेत काय, याचा शोध घेणे, आरोपींची वैद्यकीय तपासणी करण्याकरिता पोलीस कोठडीची मागणी सरकारी वकिलांनी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

**लोकमत** – दि. १० नोव्हेंबर, २०१९

# चंदनाची झाडे चोरणाऱ्यास अटक

पुणे : चतु:शृंगी परिसरातून चंदनाची दोन झाडे चोरून नेल्याप्रकरणी आणखी दोघांना पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली. रामदास बारकू भालेराव (वय ३२) व संदीप चंद्रकांत भालेराव (वय २२, रा. पारगाव, ता. खेड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. यापूर्वी एकाला अटक केली होती. त्याची जामिनावर सुटका झालेली आहे. ही घटना १९ ऑगस्ट रोजी औंध येथील जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय येथे घडली आहे. पशुवैद्यकीय आवारातून अज्ञातांनी चंदनाच्या दोन झाडांचे १० हजारांचे बुंधे चोरून नेले होते. यापूर्वी चोरलेले चंदन कोणास विकले आहे? या तपासासाठी त्यांना पोलीस कोठडी देण्यात आली.

लोकमत – दि. १३ नोव्हेंबर, २०१९

# कोयता बाळगणाऱ्या तडीपाराला अटक

## सहकारनगर पोलीस : प्रतिबंधात्मक उपाययोजना

लोकमत न्यूज नेटवर्क

**धनकवडी :** तडीपार आदेशाचा भंग करीत बेकायदा हत्यार (कोयता) बाळगणाऱ्या सराईत आरोपीला अटक करण्यात सहकारनगर पोलिसांना यश मिळाले आहे. महेश राजेंद्र नवले (वय २१ वर्षे, राहणार पर्वतीदर्शन) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून कोयता जप्त करण्यात आला.

सहकारनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महंमद पैगंबर जयंतीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सहकारनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. पेट्रोलिंग करीत असताना तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक गौरव देव व पोलीस नाईक प्रकाश मरगजे यांना त्यांच्या खास बातमीदारांकडून स्वारगेट पोलिस स्टेशनमधील रेकॉर्डवरील गुन्हेगार नवले हा महात्मा गांधी सोसायटी सहकारनगर भाग एक येथे हत्यार घेऊन थांबला असल्याची माहिती मिळाली. सहकारनगर पोलीस स्टेशन तपास विभागाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक गौरव देव व पोलीस नाईक प्रकाश मरगजे यांनी महात्मा गांधी सोसायटीमध्ये सापळा रचून नवले याला ताब्यात घेतले व त्याच्याकडून कोयता जप्त केला.

ही कामगिरी सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवई, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक गौरव देव, पोलीस हवालदार विजय मोरे, संदीप जाधव, भुजंग इंगळे, प्रदीप बेडिस्कर व पोलीस नाईक प्रकाश मरगजे यांनी केली.

पुढारी – दि. ०९, ऑक्टोबर, २०१९

# गावठी पिस्तूलसह सराइताला अटक

पुणे : प्रतिनिधी

[illegible]



[illegible]

महाराष्ट्र टाइम्स – दि. ६ नोव्हेंबर, २०१९

# तरुणपणाच्या प्रेमाची उतारवयात झळ

**चाळीस वर्षांपूर्वीच्या फरारी आरोपीला अटक**

पुणे : तरुणपणी प्रेम प्रकरणातून केलेले अल्पवयीन मुलीचे अपहरण एका आरोपीला चांगलेच महागात पडले आहे. चाळीस वर्षांपूर्वी घडलेल्या या गुन्ह्यात ते फरारी होते. त्यांची माहिती समजल्यावर स्वारगेट पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीचे सध्याचे वय ५८ आहे. १९८० मध्ये आरोपीचे १५ वर्षीय मुलीशी प्रेम जुळले. त्या मुलीला लग्न करण्याची फूस लावून आरोपीने पळवून नेले. मात्र, नंतर तिच्याशी लग्न केले नाही. याप्रकरणी १९८० मध्ये स्वारगेट पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी दोषारोपपत्रही दाखल केले होते. पण, आरोपी कोर्टातील तारखांना हजर राहत नव्हता. समन्स, वॉरन्ट काढूनही आरोपी हजर झाला नाही. त्यामुळे कोर्टाने त्याला फरारी घोषित केले होते. त्याच्याविरोधात स्वारगेट पोलिस ठाण्यात पळून गेल्याचा स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला. नंतरच्या काळात आरोपीने दुसऱ्या महिलेशी लग्न केले. त्याला पाच अपत्ये झाली. आरोपीला आता नातवंडेही आहेत. उतारवयात लागल्यामुळे आरोपीला या गुन्ह्याची तशी भीती राहिली नव्हती. पण, चाळीस वर्षांपूर्वीच्या या गुन्ह्यात फरारी असलेल्या आरोपीची माहिती समजल्यानंतर स्वारगेट पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

या गुन्ह्यातील आरोपीला पकडण्यासाठी स्वारगेट पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवाडी यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आरोपीची माहिती काढण्यात आली. त्या वेळी आरोपी गुजरवाडी परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस निरीक्षक शब्बीर सय्यद यांच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले. त्याला कोर्टाने समन्स दिली. दावा सुरू करून आरोपीची 'बाँड'वर सुटका करण्यात आली.

सामना – दि. १९ नोव्हेंबर, २०१९

# सारसबाग परिसरात तरुणाला लुटणारे जेरबंद

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) – सारसबाग परिसरातील पदपथावरून जाताना तरुणाला लुटणाऱ्या दोघांना स्वारगेट पोलिसांनी जेरबंद केले. ही घटना काल रात्री आठ वाजण्याच्या सुमारास सिंहगड रस्त्यावर सारसबाग परिसरात घडली.

रोहित अण्णा रणदिवे (वय २७, रा. पर्वती पायथा) आणि ओंकार काळूराम ताटे (वय २१, रा. दत्तवाडी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी अमित सपकाळ (वय ३६, रा. जनता वसाहत पर्वती) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

अमित काल साडेसात वाजता सारसबाग परिसरात फिरण्यासाठी गेले होते. रात्री तेथून परतत असताना रोहित आणि ओंकारने त्यांना पकडले. दोघांनी अमितच्या खिशातील पाच हजार रुपयांची रोकड काढून पळ काढला. ही माहिती पोलीस शिपाई संतोष कांबळे आणि शिवाजी सरग यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी दोघांना पकडले. पोलीस उपनिरीक्षक एस. बी. जाधव अधिक तपास करीत आहेत.

**हडपसरमध्ये तरुणाला लुटले**

गॅरेजसमोर बसलेल्या तरुणाचा रोख रकमेसह मोबाईल असा १४ हजारांचा ऐवज लुटणाऱ्या एकाला हडपसर पोलिसांनी जेरबंद केले. ओमकारसिंग करतारसिंग टाक (वय २४, रा. हडपसर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी रमेश पोवार (वय ३०, रा. भेकराईनगर, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. सहायक पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे अधिक तपास करीत आहेत.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २३ नोव्हेंबर, २०१९

# पुणे स्टेशन परिसरात बेशिस्त रिक्षांना दंड

## १७५ चालकांकडून ४५ हजारांचा दंड वसूल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे स्टेशन परिसरात गुरुवारी वाहतूक पोलिसांनी वाहतुकीला अडथळा करून रस्त्यावर उभ्या केलेल्या १७५ रिक्षांवर कारवाई करून ४५ हजार रुपयांचा दंड वसूल केला. या कारवाईत सातत्य ठेवून वाहतुकीला शिस्त लावावी, अशी अपेक्षा या वेळी नागरिकांनी व्यक्त केली.

पुणे रेल्वे स्थानक परिसर आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोठ्या प्रमाणावर बेशिस्त रिक्षांचे साम्राज्य पसरले असून, वाहतुकीवर आणि पादचाऱ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे वृत्त 'महाराष्ट्र टाइम्स'ने मांडले होते. त्याची दखल घेऊन बंडगार्डन वाहतूक विभागाने गुरुवारी आणि शुक्रवारी १७५ बेशिस्त रिक्षांवर कारवाई केली. तसेच, या कारवाईत सातत्य ठेवले जाणार असल्याचेही पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

या ठिकाणी रिक्षांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे वेळ काढत बेशिस्त रिक्षांवर कारवाई करणे आणि स्टँडवर रिक्षा एका रांगेत थांबविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच, मुख्य रस्त्यावरील वर्दळीला अधिक वाव मिळण्यासाठी पीएमपी बसना रेल्वे स्थानकातून सोडण्याची योजना सुरू करण्यात आली आहे, असे वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.




### तीन पीएमपी जप्त

स्टेशन परिसरात रस्त्यावर बंद पडून वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या तीन पीएमपी बसवर वाहतूक पोलिसांनी जप्तीची कारवाई केली आहे. कायदेशीर दंड भरल्यानंतरच या बस सोडण्यात येतील, अशी माहिती बंडगार्डन वाहतूक विभागाचे सहायक निरीक्षक संभाजी गोलांडे यांनी दिली. स्टेशन परिसरात गर्दीच्या वेळेला बस बंद पडणे, वाहतुकीसाठी मोठा अडथळा ठरते. त्यामुळे अशा बसवर तीव्र कारवाई करण्याची गरज असल्याचे गोलांडे यांनी सांगितले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २५ नोव्हेंबर, २०१९

# बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्या व्यक्तीला स्टेफिन हॉटेलजवळून वानवडी पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून एक पिस्तूल व चार जिवंत काडतुसे असा ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. भांडणाचा बदला घेण्यासाठी आरोपीने पिस्तूल आणल्याचे समोर आले आहे.

डॅनी उर्फ छोटू पॅाटर स्वामी (वय २२, रा. कोंढवा खुर्द) असे अटक केलेल्याचे नाव आहे. वानवडी पोलिस ठाण्याचे सहायक फौजदार प्रदीप गुरव यांना माहिती मिळाली, की



हॉटेल स्टेफिनजवळील केदारीनगर येथे एक व्यक्ती उभा आहे. त्याच्याजवळ एक पिस्तूल आहे. त्यानुसार पोलिस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांच्या पथकाने आरोपीला पकडले. त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळ एक देशी बनावटीचे पिस्तूल व चार जिवंत काडतुसे मिळाली. त्याबाबत चौकशी केली असता त्याने हे पिस्तूल दौंड येथील महेश पोमे याच्याकडून आणल्याचे सांगितले.

गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये स्वामी याचे दोन वर्षांपूर्वी कोंढवा परिसरात काही जणांबरोबर वाद झाले होते. त्या वेळी त्याच्यावर हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या मारहाणीचा स्वामीच्या मनात राग होता. त्यामुळे बदला घेण्यासाठी त्याने हे पिस्तूल आणल्याचे समोर आले. या प्रकरणी त्याच्यावर वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

Pune Mirror - 6 November, 2019

# Goodwin Jewellers booked for duping 89 people in a bogus investment scheme

**FIR filed says investors had put in ₹3L each in the company last year**

Archana More
@timesgroup.com
TWEETS @Archana_Mirror

Koregaon Park (KP) police have filed a cheating case against Goodwin Jewellers for duping 89 people to the tune of Rs 3.4 crore. This is the second time that a first information report (FIR) has been lodged in Pune against the directors of Goodwin Jewellers.


KP police have booked managing director Sunilkumar Mohanan, director Sudhirkumar Mohanan, branch manager Justine, salesgirl Shrikala Nair and others under sections 420 (cheating) and 409 (criminal breach of trust) of the Indian Penal Code and under relevant sections of Maharashtra Protection of Interest of Depositors (in Financial Establishments) Act.

Asha Gaikwad (45), resident of Yerwada, has filed a complaint with KP police in this regard. According to the information given by police, the complainant and rest of the people had invested Rs 3 lakh each with Goodwin Jewellers last year. The accused had promised them to give handsome returns but did not return their money since 2018. On Tuesday, the investors had gathered at Goodwin Jewellers located at Connaught Place in Bund Garden to agitate over their losses.

> "We registered the FIR on Tuesday night against the company for cheating and duping 89 people
>
> —BG Shendage, PSI, Koregaon Park PS

Earlier too, Nigdi police had lodged a cheating case of Rs 29 lakh against the jeweller. The complainant, identified as Yohannan Thomas (64), a resident of Morwadi, had filed the case against Goodwin Jewellers' manager, director and managing director, apart from one other person. The complainant and his wife had invested money in a fixed deposit scheme with the company. Accordingly, Thomas put in Rs 29 lakh since 2012 with Goodwin Jewellers. Despite the fixed deposit deadline having ended, the accused did not give back the invested sum as agreed upon in the terms and conditions.

Talking about the case, police sub-inspector BG Shendage of KP police, said, "We registered the FIR on Tuesday night against the company for cheating and duping 89 people of Rs 3,40,43,880. Further investigation on the matter is on."





This is the second time that an FIR has been filed against Goodwin Jewellers

महाराष्ट्र टाइम्स – दि. ५ नोव्हेंबर, २०१९

# विद्यार्थिनीला त्रास देणारा अटकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

[illegible]



## पोलिसांचे आवाहन

[illegible]

## क्राइम डायरी

[illegible]

## पैशाच्या बहाण्याने तरुणाला गंडा

[illegible]

मटा इम्पॅक्ट

# ‘अति’ तेथे कारवाई

## स्टेशन परिसरातील अडथळा करणारी अतिक्रमणे हटविली

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे रेल्वे स्थानक आणि परिसरातील पदपथांवरील अतिक्रमणांवर पुणे महापालिका प्रशासनाच्या अतिक्रमणविरोधी विभागाने कारवाई केली. त्यामुळे स्टेशन रस्ते आणि पदपथांनी मोकळा श्वास घेतला. परिणामी, पादचाऱ्यांसाठी चालण्यासाठी पदपथ उपलब्ध झाला. तसेच, वाहतूक सुरळीत चालण्यासाठी रस्ते मोकळे झाले. [illegible]

### ‘वाहतूककोंड्या’ची गोष्ट

[illegible]









### कारवाईत सातत्य राहणार?

स्टेशन परिसरातील कारवाईसाठी महापालिका आणि पोलिस एकत्र आले. यापूर्वी अनेकदा या ठिकाणी कारवाई झालेली आहे. मात्र, कारवाईनंतर ‘जैसे थे’ परिस्थिती होते. त्यामुळे येथील कारवाईत सातत्य राहणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### कारवाईत संयुक्त सहभाग

[illegible] महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाच्या अधिकाऱ्यांसह बंडगार्डन पोलिस आणि बंडगार्डन वाहतूक पोलिस यांनीही सहभाग घेतला. वाहतुकीच्या दृष्टीने अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांवर विशेषतः ही कारवाई करण्यात आली.

[illegible]

**लोकमत** – दि. १२ नोव्हेंबर, २०१९

# हरवलेली बॅग केली परत

पुणे : महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग मोटारसायकलला अडकवली असताना ती रस्त्यात पडल्याने गहाळ झाली. दुचाकीस्वाराला याचा पत्ता नव्हता; मात्र एका नागरिकाला ती रस्त्यात पडलेली बॅग सापडल्याने त्याने ती प्रामाणिकपणे पोलिसांच्या ताब्यात दिली. यामुळे बॅग मालकाने त्या नागरिकाबरोबरच पोलिसांचेदेखील आभार मानले.

१० नोव्हेंबर रोजी धनकवडी येथे राहणारे राजाराम सोमन्ना हे आपल्या दुचाकीवरून के. के. मार्केटवरून बिबवेवाडीकडे जात होते. त्या वेळी मोटारसायकलला त्यांनी आपली बॅग अडकवली होती. काही अंतर पुढे गेल्यानंतर त्यांना बॅग रस्त्यात पडल्याचे लक्षात आले. दरम्यान ती बॅग अप्पर इंदिरानगर येथे राहणारे महेश राजेंद्र कावरे यांना सापडली. त्यांनी ती बिबवेवाडी पोलीस ठाण्यात जमा केली.

ठाणेअंमलदार सहायक पोलीस फौजदार जगताप यांनी कागदपत्रांवर नाव असलेल्या सोमन्ना यांना फोन करून बॅग पोलीस ठाण्यात जमा करण्यात आल्याची माहिती दिली.

**प्रभात** – दि. १० नोव्हेंबर, २०१९

# आतापर्यंत १०० हून अधिक वाहनांवर कारवाई

## भारती विद्यापीठ वाहतूक पोलिसांनी सुरू केलीय 'मिशन क्लीन कात्रज' मोहीम

**प्रभात वृत्तसेवा**

**कात्रज, दि. ९ –** भारती विद्यापीठ वाहतूक विभागाच्या मार्फत 'मिशन क्लीन कात्रज' मोहिमेंतर्गत अवैध प्रवासी वाहने, अवैध सहाआसनी प्रवासी वाहने, सहा व तीन आसनी रिक्षांवर कारवाई करण्यात आली आहे. आतापर्यंत आठवड्याभरात एकूण शंभरच्यावर वाहनांवर कारवाई करण्यात आली.



यामध्ये कात्रज-सातारा, कात्रज-नसरापूर, कात्रज-शिरवळ, कात्रज-भोर, अशा मार्गांवरील अनेक वाहनांवर कारवाई करण्यात आली. महामार्गावर अवैधपणे प्रवासी वाहून नेले जात होते. तर अनेक बेशिस्तपणे पीएमपीच्या बसेस पार्किंग केलेल्या अवस्थेतील बसेसवर कारवाई करण्यात आली. तसेच दुचाकी बेशिस्त पार्किंग, चुकीच्या बाजूने रस्ता क्रॉसिंग अशा वाहनांवर कारवाई करण्यात आली.

> 'मिशन क्लीन कात्रज' या मोहिमेद्वारे कात्रज परिसरामधील व चौकांमधील होणारी वाहतूक कोंडी तसेच त्यामुळे होणारे अपघात आणि चौकाला बसलेला अवैध प्रवासी वाहतूक वाहनांचा अतिक्रमणाचा विळखा प्रथमतः सोडविण्याचे काम सुरू आहे. कात्रज चौक परिसरामध्ये वाहतूक करणाऱ्या रिक्षा किंवा अन्य प्रवासी वाहने यांच्यासाठी त्यांनी चौकापासून एक किलोमीटर लांब थांबणे गरजेचे आहे
>
> राजेश पुराणिक, पोलीस निरीक्षक.

**सामना** – दि. १९ नोव्हेंबर, २०१९

# मोक्कातील फरारी जेरबंद

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) - टेम्पोचालकासह त्याच्या भावावर चाकूने वार करून २३ हजार रुपये लुटून फरार झालेल्या सराईताला गुन्हे शाखेच्या पथकाने एका वर्षानंतर जेरबंद केले.

अमोल भाऊ गोणते (वय २४, रा. चावसर, ता. मावळ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. गोणते हा सुतारदरा परिसरात येणार असल्याची माहिती पोलीस शिपाई कैलास साळुंके व नितीन रावळ यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून गोणतेला ताब्यात घेतले. चौकशीत मदतीने टॅम्पोचालकासह त्याच्या भावाला लुटल्याची कबुली दिली. ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, पोलीस उपनिरीक्षक किरण अडागळे, कैलास साळुंके, नितीन रावळ, विल्सन डिसोझा, किशोर शिंदे, दत्तात्रय गरुड, दीपक मते, अनिल शिंदे, क्षीरसागर, रोहिदास लवांडे, प्रवीण तापकीर, रामदास गोणते, गजानन गानबोटे यांच्या

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. १२ नोव्हेंबर, २०१९

## प्रवाशाला लुटणारा रिक्षाचालक अटकेत

पुणे : पुणे स्टेशन परिसरात रिक्षात बसलेल्या प्रवाशाला रिक्षाचालक व त्याच्या दोन साथीदारांनी लुटल्याचा प्रकार रविवारी रात्री घडला. गस्तीवरील बीट मार्शल हा प्रकार आढळून आल्यानंतर बंडगार्डन पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

कपिल प्रभाकर खिलारे (वय ४३), विजय फक्कड डावरे (वय ३१, रा. दापोडी दत्तवाडी), अब्दुलरज्जाक हुसेन पोतन (वय २५, रा. वारजे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी राहुल बाळाजी आडे (वय २४, रा. वरसगाव, मुळशी) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार राहुलला पुणे स्टेशनला जायचे होते. त्यासाठी त्याने स्वारगेट येथून रिक्षा केली होती. काही अंतर गेल्यानंतर आरोपी विजय व अब्दुलरज्जाक रिक्षात बसले. राहुलला शंका आल्यामुळे त्याने खिलारेला विचारणा केली. त्या वेळी त्याने आपले मित्र आहेत, असे सांगितले. रिक्षा ससून रुग्णालयाच्या परिसरात आली असताना तिघा आरोपींनी राहुलला दमदाटी करून ५०० रुपयांची मागणी केली. मात्र, हा प्रकार गस्तीवर असलेल्या बीट मार्शलच्या लक्षात आला. त्या वेळी दोघा बीट मार्शलनी रिक्षाजवळ जाऊन चौकशी केली असता हा सर्व प्रकार समोर आला.

**लोकमत** – दि. ११ नोव्हेंबर, २०१९

# रस्त्यावर पार्क केलेली दुचाकी चोरणाऱ्यास अटक

लोकमत न्युज नेटवर्क

**पुणे :** रस्त्यावर पार्क केलेली दुचाकी चोरून नेल्याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी एकाला अटक केली. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश दिला.

आशिष कमलाकर डांगे (वय १९, रा. दांडेकर पूल) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत मंगेश दिलीप ससे (वय २४) यांनी फिर्याद दिली आहे. १५ सप्टेंबर रोजी रविवार पेठ परिसरात ही घटना घडली. ससे यांनी त्यांची दुचाकी रविवार पेठ परिसरातील एका स्वीट मार्ट दुकानासमोरील रस्त्यावर पार्क करुन ठेवली होती. चोरट्याने ती चोरुन नेली, असे फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी डांगे याला न्यायालयात हजर केले असता, त्याने आणखी चार दुचाकी चोरल्याची कबुली दिली असून, त्याबाबत तपास करण्यासाठी, त्याचा आणखी कोणी साथीदार आहे का? त्याने अशा प्रकारचे आणखी किती गुन्हे केले आहेत? याचा तपास करण्यासाठी त्याला पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील ज्ञानेश्वर मोरे यांनी केली.

**लोकमत** – दि. ४ नोव्हेंबर, २०१९

# एक कोटीचा अपहार करणारे जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** एटीएम मशीनच्या पासवर्डचा गैरवापर करून या मशीनमध्ये भरण्यास दिलेली ११ लाख ५६ हजार ६०० रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी फरार असलेल्या आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले आहे. ११ ऑक्टोबर रोजी याप्रकरणी खडकी पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्याची नोंद झाली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राकेश वसंत जोशी (वय ३४, रा. सिंहगड, पुणे) व सुयश किशोर पवार (वय ३३, रा. यशवंतनगर वाघोली पुणे) यांना पोलिसांनी अटक केली आहे. हे दोघेही सिक्युरीटीट्रान्स इंडिया प्रा.लि. या कंपनीत कार्यरत होते. या कंपनीमार्फत नेमून दिलेल्या रुट नंबर १० या मार्गावरील ११ बँक एटीएम मशीनच्या पासवर्डचा गैरवापर करून यांनी संगनमताने त्यामधील रकमेचा अपहार केला होता. त्यानंतर हे दोघे जण फरार झाले होते. पोलिसांनी तपासाअंती या दोघांना जेरबंद करून, २ नोव्हेंबरपर्यंत त्यांच्याकडून १२ लाख ४१ हजार रुपये रोख व इतर माल हस्तगत केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक शकील पठाण व त्यांचे सहकारी करीत आहेत.

**सामना** – दि. २४ नोव्हेंबर, २०१९

# शस्त्रे बाळगणाऱ्या दोघांना अटक

पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) - शहराच्या मध्यवर्ती भागात हातात घातक शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून दोन कोयते तसेच हॉकी स्टिक जप्त करण्यात आली आहे.

अभिषेक मनोज घारमळकर (वय २३, रा. बुधवार पेठ), राजेश नरसप्पा धनगर (वय २०, रा. लोहियानगर, महात्मा फुले पेठ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. आठवड्याभरापूर्वी घारमळकर आणि धनगर यांचा बुधवार पेठेतील क्रांती हॉटेलजवळ काहीजणांशी किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर दोघेजण पुन्हा गणेश पेठ परिसरात थांबले असून, त्यांनी पोत्यात दोन कोयते आणि हॉकी स्टिक गुंडाळून आणल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट एकच्या कर्मचाऱ्यांना मिळाली. यानुसार सापळा लावून दोघांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आठ दिवसांपूर्वी झालेल्या भांडणाचा वचपा काढण्यासाठी दोघांनी कोयते बाळगल्याची कबुली दिली. पोलीस निरीक्षक अरुण वायकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक उत्तम बुदगुडे, अजय थोरात, तुषार खडके, सुभाष पिंगळे यांनी ही कारवाई केली.

**सामना** – दि. २७ नोव्हेंबर, २०१९

# तीन सराईत दोन वर्षांसाठी हद्दपार

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) - तीन सराईतांना दोन वर्षांसाठी पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. पोलीस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड यांच्या आदेशानुसार सराईतांवर कारवाई करण्यात आली.

हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नरेश ऊर्फ नब्बा सचिन दिवटे (वय २२, रा. दांडेकर पूल) कोथरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून स्वप्नील छगन जोरी (वय २३, रा. सुतारदरा, कोथरूड) आणि गणेश हनुमंत जोरी (वय २२, रा. दत्तनगर, कोथरूड) अशी हद्दपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

**सामना** – दि.८ नोव्हेंबर, २०१९

# घरफोडीप्रकरणी फरार आरोपीला तब्बल १२ वर्षांनंतर अटक

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) – कोंढवा परिसरातील घरफोडी करून फरार झालेल्या आरोपीला १२ वर्षांनंतर अटक करण्यात गुन्हे शाखेला यश आले. आरोपीला वानवडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

रियाज रज्जाक मरूळ (रा. अंबिकानगर, बिबवेवाडी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. २००७ मध्ये कोंढवा परिसरातील दोन सोसायट्यांमध्ये घरफोडीचे प्रकार घडले होते. त्यामध्ये ४३ हजारांचा ऐवज चोरीला गेला होता. याप्रकरणी वानवडी पोलिसांनी काही आरोपींना अटक केली होती. त्यावेळी रियाज हा या घटनेपासून फरार झाला होता. गुन्हे शाखेकडून फरार आरोपींचा शोध घेण्यात येत असताना कर्मचारी अमोल पवार यांना रियाजची माहिती मिळाली. रियाज हा सोमाटणे फाटा येथे हमाली काम करण्यासाठी येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला पकडले. चौकशीत त्याने कोंढव्यातील घरफोडीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिली. तसेच दोन घरांत घरफोडी करून घड्याळ, कॅमेरे चोरून नेल्याचे सांगितले. गुन्हा केल्यापासून घर बदलून राहत असल्याचे सांगितले. ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण वायकर, उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, योगेश जगताप, अमोल पवार, वैभव स्वामी, अजय थोरात, बाबा चव्हाण, सुभाष पिंगळे यांच्या पथकाने केली.

**The Indian EXPRESS** - 23 November, 2019

# Viman Nagar: 2 arrested with elephant tusks

Pune: The Pune City Police has arrested two persons over illegal possession of elephant tusks in Viman Nagar area on Friday.

Police have identified the two suspects as Yahiya Ahmad Khan (42) and Abhay Arvind Joshi (55), both residents of Navi Mumbai.

Acting on a tip-off to Police Sub-Inspector A D Pingle, a team led by Senior Police Inspector Gajanan Pawar and Inspector Balwant Mandge laid a trap on Sakore Nagar Road in Viman Nagar area and nabbed the two suspects around 4.45 pm on Friday.

During searches, police recovered two elephant tusks along with a four-wheeler, cell phones and other items, all worth Rs 45.37 lakh, from their possession.

"Probe is on to know how the two suspects procured the elephant tusks and to whom they were planning to sell them," said a senior police officer. ENS

सामना – दि. १२ नोव्हेंबर, २०१९

# सराईत दुचाकीचोर जेरबंद

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) - शहरातील विविध भागांत दुचाकींची चोरी करणाऱ्या एका सराईताला फरासखाना पोलिसांनी जेरबंद केले. त्याच्या ताब्यातून एक लाख ५५ हजार रुपये किमतीच्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या.

आशीष कमलाकर डांगे ( वय १९, रा. दांडेकर पूल) असे अटक केलेल्याचे नाव आहे. दांडेकर पुलनजीक पेट्रोलिंगदरम्यान एकजण संशयास्पदरीत्या दुचाकीवर थांबल्याचे पोलिसांना दिसले. त्यानुसार पोलिसांनी आशीषला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने फरासखाना, सहकारनगर, अलंकार, कोथरूड आणि हडपसर पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून पाच दुचाकी चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून पाच दुचाकी जप्त केल्या. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक यशपाल सूर्यवंशी, बापूसाहेब खुटवड, केदार आढाव, सयाजी चव्हाण, अमर शिंदे, अमोर सरडे, विकास बोऱ्हाडे, शंकर कुंभार, दिनेश भांदुर्गे, विशाल चौगुले, महावीर लव्हटे, मोहन दळवी, आकाश वाल्मीकी, अमेय रसाळ, मयूर भोकरे यांच्या पथकाने केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १९ नोव्हेंबर, २०१९

# सारसबाग परिसरात लुटणारे अटकेत

पुणे : सारसबाग येथील बसस्टॉपजवळ एका तरुणाशी झटापट करून लुटल्याचा प्रकार रविवारी रात्री घडला. या प्रकरणी लूटमार करणाऱ्या दोघांना स्वारगेट पोलिसांनी अटक केली आहे.

रोहित अण्णा रणदिवे ( वय २७, रा. पर्वती पायथा), ओंकार काळुराम ताटे ( वय २३, रा. नीलायम टॉकीजजवळ) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. या प्रकरणी अमित सपकाळ ( वय ३६, रा. जनता वसाहत) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार रविवारी रात्री आठच्या सुमारास सारसबाग बसस्टॉपजवळ थांबले होते. त्या वेळी आरोपींनी त्यांच्याशी झटापट करून खिशातील पाच हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले होते. स्वारगेट पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी संतोष कांबळे, शिवाजी सरग यांनी वर्णनावरून दोघांना अटक केली.



# बेशिस्त वाहनचालकांवर आता डिजिटल कारवाई

## 'सतर्क ॲप' च्या माध्यमातून वाढविला कारवाईचा वेग

पुणे : प्रतिनिधी

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी डिजिटल पद्धतीचा अवलंब केला जात आहे. नियम मोडणाऱ्यांवर सतर्क ॲपच्या माध्यमातून छायाचित्र काढून डिजिटल कारवाई करण्यात येत आहे. वाहतूक कर्मचाऱ्यांकडून सिग्नलवर थांबलेल्या वाहनचालकांचे छायाचित्र काढण्यावर भर दिला जात असून अत्याधुनिक त्याचा डिजिटल डेटा जमा केला जाणार आहे. त्यानंतर दंड वसुलीच्या कारवाईला चालना दिले जाणार आहे.


**वाहतुकीची शिस्त मोडणाऱ्यांवर बडगा**

**सिग्नलवर थांबलेल्या चालकाचे छायाचित्र करतात ॲपवर अपलोड**

**सीसीटीव्ही चित्रफितीच्या माध्यमातूनही कारवाई सुरूच**

**नियमांचे उल्लंघन केल्यास स्पीड पोस्ट, मोबाइलवर पाठविणार कारवाईचा संदेश**

### पोस्टाद्वारे सूचनापत्र पाठविणार



# गंभीर मारहाणप्रकरणी दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** भाजीपाल्याची हातगाडी लावण्यावरून झालेल्या वादातून एकाला मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी सिंहगड रोड पोलिसांनी दोघांना अटक केली. न्यायालयाने त्यांना ७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश दिला.

योगेश दैविदास कांबळे (वय २२, रा. हिंगणे), विजय गणेश देवळीकर (वय २२, रा. धायरी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत २७ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. २ नोव्हेंबर रोजी ही घटना घडली. फिर्यादी यांचे पती आणि योगेश यांच्यामध्ये हातगाडी लावण्याच्या कारणावरून भांडणे झाले होती. त्यामुळे फिर्यादी यांच्या पतीने याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याच्या कारणावरून योगेश आणि त्याच्या मित्राने फिर्यादीच्या पतीवर कोयत्याने वार करून त्यांना गंभीर जखमी केले, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी दोघांना न्यायालयात हजर केले असता गुन्ह्याच्या तपासासाठी त्यांना पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील राजश्री कदम यांनी केली.

## घरफोडीप्रकरणी दोघांच्या कोठडीत वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** हिंजवडी परिसरात घरफोड्या केल्याप्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या दोघांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आली. न्यायालयाने त्यांना ६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. रोहित विष्णू शिंदे (वय १९, बावधन बुद्रुक) व नारायण जालिंदर कानडे (वय २१) अशी पोलीस कोठडी सुनावलेल्यांची नावे आहेत. याबाबत पिंपळे सौदागर येथील उदयकुमार राव (वय ४१) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. एका महिलेसह दोघांवर गुन्हा दाखल आहे. जानेवारी २०१९ मध्ये हा प्रकार घडला आहे.

आरोपीने पिंपळे सौदागर येथील काम करत असलेल्या शोरूम फोडून साडेचार लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी दोघांना अटक केली होती. त्यांच्या पोलीस कोठडीची मुदत सोमवारी संपल्याने त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने दोघांच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांनी वाढ केली.

# शिवीगाळ करणारा अटकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करत असताना पोलिसाला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीला कोरेगाव पार्क पोलिसांनी अटक केली आहे.



विनीत रवींद्र इंगळे (वय १९, रा. सातववाडी, हडपसर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी मिनिनाथ चंद्रकांत भागवत (वय ३५, रा. कोरेगाव पार्क वाहतूक विभाग) यांनी तक्रार दिली आहे. कोरेगाव पार्क येथील सिटिबँक कंपनीच्या क्वार्टरसमोर सोमवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार भागवत साडेबाराच्या दरम्यान कोरेगाव पार्क परिसरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करत होते. या वेळी आरोपी त्याच्या चारचाकी गाडीतून सीटबेल्ट न लावता गाडी चालविताना दिसला. त्या वेळी तक्रारदार यांनी गाडी रस्त्याच्या बाजूला घेण्यास सांगितली. आरोपीने गाडी बाजूला न घेता रस्त्याच्या मध्यभागी उभी करून तक्रारदार यांना दमदाटी सुरू केली. तसेच त्यांच्या अंगावर धावत जाऊन 'मी खून केला आहे, त्यामुळे तुम्ही काय आहात?' असे बोलून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

**मारहाण करून दुधाची चोरी**

हडपसर परिसरातील कन्यादान मंगल कार्यालयाजवळ दूध व्यावसायिकाला रविवारी पहाटे मारहाण करून वीस लिटर दुधाच्या पिशव्या चोरून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रमोद नेवसे (वय ४८, रा.हडपसर) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार दुचाकीवरील दोन व्यक्तींच्या विरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांचा दूधविक्रीचा व्यवसाय आहे. रविवारी पहाटे ते दूधविक्रीसाठी बाहेर पडले होते. हडपसर परिसरातील कन्यादान मंगल कार्यालयाजवळ त्यांच्याकडून आरोपी दोन व्यक्तींनी दूध विकत घेतले. त्यानंतर परत येऊन त्यांना मारहाण करून त्यांच्याकडील ट्रेमध्ये ठेवलेल्या वीस लिटर दुधाच्या पिशव्या घेऊन पळून गेले. या प्रकरणी हडपसर पोलिस तपास करीत आहेत.

**कंपनीतील रोकड चोरीला**



धनकवडी येथील इनटेक्स ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस कंपनीचे लॉकर बनावट चावीच्या साह्याने उघडून त्यामधील पावणेतीन लाख रुपयांची रोकड लंपास करून चोरट्यांनी पोबारा केला आहे. या प्रकरणी सहकारनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कंपनीचे मॅनेजर पुष्पेंद्र यादे (वय ३५, रा. कामोठे, नवी मुंबई) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांची कंपनी ही ऑनलाइन खरेदी केलेल्या वस्तू ग्राहकांना पोच देण्याचे काम करते. कंपनीचे कार्यालय बंद असताना मुख्य दरवाज्याचा कडी कोयंडा तोडून चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश केला. त्यानंतर कंपनीमधील लॉकर बनावट चावीच्या साह्याने उघडून त्यातील दोन लाख ७८ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. या प्रकरणी हडपसर पोलिस तपास करत आहेत.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २४ नोव्हेंबर, २०१९

# कोयते, हॉकी स्टिक बाळगणाऱ्यांना अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

धारदार कोयते; तसेच हॉकी स्टिक बाळगणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या 'युनिट १'च्या पथकाने गुरुवारी अटक केली. त्यांच्याकडून दोन कोयते आणि हॉकी स्टिक जप्त करण्यात आली आहे.

अभिषेक मनोज पारमळकर (वय २३, रा. बुधवार पेठ), राजेश उर्फ राजू नरसप्पा धनगर (२०, रा. लोहियानगर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. गुन्हे शाखा 'युनिट १'चे कर्मचारी खासगी वाहनाने फरासखाना पोलिस स्टेशनच्या हद्दीत गस्त घालत असताना पोलिस कर्मचारी अमोल पवार, वैभव स्वामी यांना गणेश पेठेतील हॉटेल देवीप्रसादजवळ दोन मुले उभी असल्याचे आढळले. त्यांनी पोत्यात कोयत्यासारखी हत्यारे घेतली होती. ती मुले काहीतरी गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून त्यांनी पंचासह घटनास्थळी जाऊन छापा घातला. तेव्हा ही दोन मुले सापडली.

त्यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे दोन धारदार कोयते आणि हॉकी स्टिक पोलिसांना सापडली. त्यांच्यावर गुन्हा दाखल करून, पुढील तपासासाठी त्यांना फरासखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या दोघांकडे तपास केला असता आठ ते १० दिवसांपूर्वी बुधवार पेठेतील क्रांती चौकात त्यांची किरकोळ भांडणे झाली होती. त्यामुळे भीतीपोटी कोयते जवळ ठेवल्याची कबुली या दोघांनी दिली. या प्रकरणी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींपैकी धनगर याच्यावर खडक पोलिस स्टेशनमध्ये कोयता बाळगल्याप्रकरणी यापूर्वी गुन्हा दाखल झाला आहे. सहायक पोलिस आयुक्त शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरुण वायकर, पोलिस उपनिरीक्षक उत्तम बुदगुडे, पोलिस अजय थोरात, तुषार खडके, सुभाष पिंगळे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

लोकमत – दि. १४ नोव्हेंबर, २०१९

# आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्याला पोलीस कोठडी

पुणे : पैसे व सोन्याच्या दागिन्यांसाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या पतीला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने त्याला १९ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

रवींद्र निवृत्ती गाडे (वय ३६, रा. कात्रज) असे अटक केलेल्याचे नाव आहे. प्रसाद ज्ञानोबा मानकर (वय ३०, रा. कोंढवे धावडे) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना ९ नोव्हेंबर २०१९ रोजी जाधवनगर येथील मुक्ताई पार्क येथे घडली. फिर्यादीच्या बहिणीचे लग्न झाल्यापासून १८ फेब्रुवारी २००३ ते ९ नोव्हेंबर २०१९ दरम्यान नवरा-बायको यांची भांडणे सुरू होती. सासरच्याने होणाऱ्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून जागृती रवींद्र गाडे हिने राहत्या घरी साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. नवऱ्याने तिला अवाजवी पैशांची आणि सोन्या चांदीच्या दागिन्यांची मागणी करून तसेच तिचा शारीरिक छळ केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. मृत महिलेने मरण्यापूर्वी नवऱ्याकडून होणाऱ्या अन्यायाबाबत असलेला चारपानी मजकूर जप्त करणे, आरोपीकडे चिठ्ठीत लिहिलेल्या मजकुराप्रमाणे तपास करणे, आजूबाजूच्या साक्षीदारांकडे मृत स्त्रीस होणाऱ्या त्रासाबाबत तपास करणे यासाठी सरकारी वकील विजयसिंह जाधव यांनी पोलीस कोठडीची मागणी केली.

प्रभात – दि. २२ नोव्हेंबर, २०१९

## रिक्षाचालकांवर कारवाई...



पुणे : स्वारगेट येथील जेधे चौकात बेशिस्तपणे वागणाऱ्या रिक्षाचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यामुळे चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# रिक्षाचालक पोलिसांच्या रडारवर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २१ - स्वारगेट येथील जेधे चौकात बेशिस्तपणे उभ्या असणाऱ्या रिक्षाचालक सध्या वाहतूक पोलिसांच्या रडारवर आहेत. मागील आठवड्यात वाहतूक विभागाने स्वारगेट परिसरातील सुमारे ५०० हून अधिक वाहनांवर कारवाई केली आहे. जेधे चौकात दोन पोलीस निरीक्षक आणि ११ कर्मचारी नेमण्यात आले आहेत. स्वारगेट वाहतूक पोलिसांनी गेल्या सात दिवसांत जोरदार कारवाई केली आहे. या परिसरात उभ्या असणाऱ्या रिक्षा, पीएमपी आणि शिवशाही बसवर दंडात्मक कारवाई केली आहे.

### रिक्षाचालकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक

नियमांचे उल्लंघन करत उभे असणारे रिक्षाचालक वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांशी वाद घालत आहे. वाहतूक विभागाने पूर्वसूचना देऊन देखील रिक्षाचालक थेट हमरीतुमरीवर येत आहेत ;परंतु रिक्षाचालकांनी वाद न घालता एका रांगेत उभे राहावे आणि शिस्तीचे पालन करावे, अशी भूमिका वाहतूक विभागाने घेतली आहे.

“ वाहतूक पोलिसांकडून बेशिस्तांवर तीव्र कारवाई करण्यात येत आहे. पीएमपीसाठी बॅरिकेडिंग करण्यात आले असून प्रवाशांच्या सोयीसाठी बॅरिकेडिंगमध्ये काही ठिकाणी जागा सोडण्यात आली आहे.

अतुलकुमार नवगिरे, पोलीस निरीक्षक, स्वारगेट वाहतूक विभाग

स्वारगेट उड्डाण पुलाखाली वाहतुकीला अडथळा करणाऱ्या आणि नो पार्किंगमध्ये उभ्या असणाऱ्या एकूण १०३ रिक्षा, बस, पीएमपी आणि खासगी ट्रॅव्हल्स बसवर कारवाई करण्यात आली. वाहनचालकांना २२ हजार २०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

लोकसत्ता – दि. १२ नोव्हेंबर, २०१९

# अमली पदार्थांची विक्री प्रकरणात तिघांना स्वारगेट भागात पकडले

प्रतिनिधी, पुणे

स्वारगेट स्थानक परिसरात गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. या प्रकरणात तिघांना अटक करण्यात आली असून त्यांनी लातूरहून पुण्यात गांजा विक्रीसाठी आणल्याचे तपासात निष्पन्न झाले.

त्यांच्याकडून मोबाइल संच आणि ५ किलो १२१ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला.

सौरभ सुनील मुंडे (रा. जिजाई बंगला, शिल्पतीनगर, धनकवडी), शुभम राजकुमार हवा (रा. एलआयसी कॉलनी, मंठीनगर, लातूर), ओम देवराम आत्राम (रा. घोटी, नांदेड) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. सराफाई पठार भागात मुंडे अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या पथकाला मिळाली. त्यानंतर या भागात सापळा लावून मुंडेला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत लातूरहून दोघेजण एसटी बसने गांजा विक्रीस घेऊन येणार असल्याची माहिती मुंडेने दिली. स्वारगेट स्थानकाच्या प्रवेशद्वाराबाहेर सापळा लावून हवा आणि आत्राम यांना ताब्यात घेण्यात आले.

तिघांकडून मोबाइल संच, ५ किलो १२१ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. पोलीस निरीक्षक किरण टिकोळे, उपनिरीक्षक हेमंत ढोले, दिलीप जोशी, अर्जुन दिवेकर, सुनील कवाडे, महेंद्र पवार, मनोज साळुंखे यांनी ही कारवाई केली.

प्रभात – दि. २२ नोव्हेंबर, २०१९

# पादचारी मार्गावरील अतिक्रमणे हटविली

## भारती विद्यापीठ पोलिसांनी केली करवाई : पर्यटकांसाठी पादचारी मार्ग मोकळा

**कात्रज, दि. २१ -** कात्रज येथील असलेले स्व. राजीव गांधी प्राणिसंग्रहालय व संशोधन केंद्राच्या प्रवेशद्वारासमोरील बाजूला महापालिकेचा पादचारी मार्ग आहे. मात्र, या पादचारी मार्गावर अनेक दिवसांपासून खाद्य विक्रेते व पथारीवाले यांच्यामार्फत झालेली अतिक्रमणे भारती विद्यापीठ वाहतूक पोलिसांमार्फत काढण्यात आली. यामुळे हा पादचारी मार्ग संपूर्णपणे मोकळा दिसत आहे. यावरून चालताना पर्यटकांना आता कोणत्याही प्रकारचा अडथळा होत नाही.

प्राणिसंग्रहालयात बाहेरील प्रवेशद्वारासमोर खाद्यपदार्थ विक्रेते व पथारीवाले यांची छोटी दुकाने आहेत. महापालिकेमार्फत यातील काहीजणांकडे परवानगी आहे. मात्र, अनधिकृतपणे या विक्रेत्यांमार्फत पादचारी मार्गावर खाद्यपदार्थ खाण्यासाठी पर्यटकांना बसण्यासाठी टेबल व खुर्च्या मांडण्यात येत होत्या. तसेच टेबल खुर्च्या मांडलेल्या जागेवर वरच्या बाजूला प्लॅस्टिकचे कागद याचे अच्छादन टाकण्यात आले होते. तसेच या पादचारी मार्गावर लहान मुलांना आकर्षित करण्यासाठी छोटी खेळणी ठेवली जायची. यामुळे पर्यटकांना या मार्गावरून चालण्यास अडथळा निर्माण होत होता.



या पादचारी मार्गावर एकूण वीस ते बावीस परवानाधारक खाद्यपदार्थ विक्रेते आहेत. मात्र, त्यांना पादचारी मार्गावर अतिक्रमण करण्याची परवानगी नाही. त्यामुळे त्यांनी अनधिकृतपणे मांडलेल्या पादचारी मार्गावरील खुर्च्या व टेबल ही काढण्यात आली. त्यामुळे हा पादचारी मार्ग मोकळा झाल्याने प्राणिसंग्रहालयात भेट देणाऱ्या पर्यटकांना पादचारी मार्गावरून चालणे सोयीस्कर झाले आहे.


> प्राणिसंग्रहालया बाहेरील पादचारी मार्गावर ठेवलेल्या काही खुर्च्या व टेबलांमुळे चालण्यास अडचण होत होती. तर गर्दीच्या वेळेस खूप कोंडी होत होती. आता मात्र पादचारी मार्ग मोकळा झाल्याने बरे वाटते.
>
> **किरण गायकवाड,**
> पर्यटक

# स्वारगेट परिसराने घेतला मोकळा श्वास

## बस स्थानकासमोर वाहतूक कोंडी करणाऱ्या १८२ रिक्षांवर कारवाई

पुणे : प्रतिनिधी

[illegible]



[illegible]

प्रभात – दि. १९ नोव्हेंबर, २०१९

# बेशिस्तांवर दंडात्मक कारवाई...



**पुणे :** साखर संकुल समोरील रस्त्यावर दुतर्फा वाहने लावण्यास बंदी असतानाही काही वाहने तेथे लावली जात होती. त्यामुळे या परिसरात नेहमीच वाहतूक कोंडी होते. अखेरीस शिवाजीनगर वाहतूक विभागाने तेथील वाहनांना जॅमर लावत दंडात्मक कारवाई केली.

The Indian EXPRESS - 9 October, 2019

PROPERTY DISPUTE

# 3 held for 'threatening family at gunpoint'

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, NOVEMBER 23

THE PUNE city police has arrested three persons for allegedly threatening a family in Kalyani Nagar at gunpoint and thrashing them following a dispute over property on Friday.

A 46-year-old man, residing in Kalyani Nagar, has lodged the complaint in this regard at Yerwada police station.

Based on the complaint, police arrested three suspects — identified as Asif Nasim Khan (50) of Pune Camp, Imran Shafiq Shaikh (32) and Sarfaraj Ismail Shaikh (30), both residents of Kondhwa.

Police said the suspects entered the house of the complainant and allegedly demanded money from him and asked him to sign on some property documents. When the complainant refused, one of the suspects allegedly threatened him at gunpoint.

"We have arrested the three suspects. A court has remanded them to police custody for two days. The complainants are tenants and the suspects have dispute with them over a property. No weapon has been recovered yet. Investigation is on," said Police Sub-Inspector Balbhim Nanaware.

प्रभात – दि. १७ नोव्हेंबर, २०१९

# विद्यार्थी वाहतुकीच्या ४४ वाहनांवर कारवाई

## आरटीओ आणि वाहतूक विभागाची मोहीम

पुणे, दि. १६ - प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि वाहतूक विभागाकडून दि. ११ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत सुमारे ४४ शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली.

नियमांचे पालन न करणाऱ्या स्कूल बस आणि व्हॅनचालकांवर कारवाई करण्यासाठी आरटीओ आणि वाहतूक विभागाकडून विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. दि. ११ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत ही कारवाई करण्यात आली, अशी माहिती सहायक परिवहन अधिकारी अश्विनी स्वामी यांनी दिली. शहरामध्ये विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या वाहनांची संख्या हजारोंच्या घरात आहे. मात्र, शालेय परिवहन समितीने नेमून दिलेल्या नियमांचे पालन न करता विद्यार्थ्यांची बेकायदेशीर आणि अवैध पद्धतीने होणाऱ्या वाहतुकीला आळा घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. या विशेष पथकांकडून होणाऱ्या कारवाईमध्ये वाहनचालकांना नोटीस देण्यात येत असून वाहनाचे कागदपत्रे ताब्यात घेत आहेत.




### पालकांनी जागरूक असणे आवश्यक

- आपला पाल्य ज्या बस/व्हॅनने जातो, त्या वाहनाची कागदपत्रे पूर्ण असल्याची खात्री करावी.
- शालेय विद्यार्थी वाहतूक करणारी वाहने सुरक्षित असल्याची पाहणी करावी.
- प्रादेशिक परिवहन कार्यालयाने नेमून दिलेल्या नियमांनुसार वाहनाची रचना असल्याची खात्री करावी.

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- पी.एस.धाडे, महिला पोलीस शिपाई ७२७८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवड्याभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रणाची कटींग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अंमलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी मिळत असल्याने त्याबाबत समाधान व्यक्त करुन पोलीसांचे कौतुक करण्यात येत आहे.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( पी.एस.धोंडे )
महिला पोलीस शिपाई ७११७
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.


दुचाकी चोरीप्रकरणी दोघांना अटक
सारसबाग परिसरात लुटणारे अटकेत
कोयता बाळगणाऱ्या तडीपाराला अटक
प्रवाशाला लुटणाऱ्या रिक्षाचालकासह तिघे अटक
गांजाची विक्री करणारा अटकेत
Crime Branch busts gang using stolen trucks in MP mines, 1 held
Viman Nagar: 2 arrested with elephant tusks
तरुणीला अश्लील व्हिडीओ पाठविणाऱ्या तरुणाला अटक
महिलांचे शोषण करणाऱ्या भोंदूबाबाला अटक
रस्त्यावर पार्क केलेली दुचाकी चोरणाऱ्यास अटक
गंभीर मारहाणप्रकरणी दोघांना अटक
PROPERTY DISPUTE
3 held for 'threatening family at gunpoint'
तरुणपणाच्या प्रेमाचं उतारवयात झळ
कोयते, हॉकी स्टिक बाळगणाऱ्यांना अटक
चंदनाची झाडे चोरणाऱ्यास अटक
3 held for cheating nine govt, private banks of Rs 59.5 lakh
City cops help tourist get back bag with valuables